**इम्पॅक्ट समिट  2026 चा नवी दिल्ली जाहीरनामा स्विकाराने समारोप**

21 फेब्रुवारी 2026

18-19 फेब्रुवारी रोजी नवी दिल्लीमध्ये आयोजित एआय इम्पॅक्ट समिट 2026, एआय इम्पॅक्ट वर नवी दिल्ली घोषणापत्र स्वीकारण्यासह संपन्न, कृत्रिम बुद्धिमत्तेवर जागतिक सहकार्यात महत्त्वपूर्ण मापदंड चिन्हांकित करते.

जाहीरनाम्याला 89 देश आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी अनुमोदन दिले असून आर्थिक विकास आणि सामाजिक कल्याणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) उपयोग करण्याबाबत व्यापक जागतिक सहमती दर्शविते.

एआयसाठी सामायिक जागतिक दृष्टीकोन

सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय (सर्वांच्या हितासाठी, सर्वांच्या सुखासाठी) या प्रेरणादायी तत्त्वाला अनुसरुन आमचा असा विश्वास आहे की, एआयचे फायदे जेव्हा मानवतेसाठी होतील तेव्हाच त्याचा खरा उपयोग होईल.

अधोरेखित करते:

आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि बहु-भागधारकांच्या सहभागाला बळकटी देणे

राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा आदर

सुलभ आणि विश्वासार्ह संरचनेद्वारे AI क्षेत्रातील प्रगती गतीमान करणे

कृतीचे सात स्तंभ (चक्र)

जाहीरनामा हा सात प्रमुख स्तंभांवर आधारित आहे. ज्याद्वारे जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता सहकार्याचा पाया तयार करतात:

एआय संसाधनांचे लोकशाहीकरण

आर्थिक विकास आणि सामाजिक कल्याण

सुरक्षित आणि विश्वसनीय एआय

विज्ञानासाठी एआय

सामाजिक सक्षमीकरणासाठी प्रवेश

मानवी भांडवल विकास

लवचिक, कार्यक्षम आणि नाविन्यपूर्ण एआय प्रणाली

महत्त्वपूर्ण जागतिक उपक्रमांची घोषणा

या शिखर परिषदेने स्वयंसेवी, सहयोगी जागतिक उपक्रमांची मालिका सादर केली, ज्यात खालील बाबींचा समावेश आहे:

1. एआयच्या लोकशाही प्रसारासाठी सनद

आधारभूत कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांवर किफायतशीर प्रवेशाला चालना

स्थानिक गरजांशी सुसंगत नवोपक्रम परिसंस्थांना पाठबळ देते

2. ग्लोबल एआय इम्पॅक्ट कॉमन्स

जागतिक स्तरावर एआय वापराच्या केसेसचे प्रमाण वाढवण्यासाठी आणि त्यांची प्रतिकृती तयार करण्यासाठी एक व्यासपीठ

विकासात्मक परिणाम साध्य करण्यासाठी देशांदरम्यान सहकार्य सक्षम करते

3. विश्वसनीय एआय कॉमन्स

टूल्स, बेंचमार्क्स आणि सर्वोत्तम कार्यपद्धतींचा संचय

सुरक्षित आणि विश्वसनीय एआय सिस्टीमच्या विकासास सहाय्य करते

4. विज्ञान संस्थांसाठी एआयचे आंतरराष्ट्रीय नेटवर्क

जागतिक वैज्ञानिक सहयोग सुलभता
एआय-चालित संशोधन क्षमता वर्धित करते

5. सामाजिक सशक्तीकरण प्लॅटफॉर्मसाठी एआय

ज्ञान देवाणघेवाण आणि विस्तारक्षम उपाययोजना सक्षम करते.
AI च्या समतुल्य वापराला प्राधान्य देते

6. एआय वर्कफोर्स डेव्हलपमेंट प्लेबुक आणि रीस्किलिंग प्रिन्सिपल्स

एआय कौशल्य, पुनर्कौशल्य आणि साक्षरतेला समर्थन देते
AI-चालित अर्थव्यवस्थेसाठी राष्ट्रांना तयार करणे

7. लवचिक आणि कार्यक्षम एआय बद्दल मार्गदर्शक तत्त्वे

ऊर्जा-कार्यक्षम एआय सिस्टीमवर लक्ष केंद्रित करते
एआय इन्फ्रास्ट्रक्चर रेझिलियन्सवरील प्लेबुकद्वारे समर्थित

आर्थिक वाढ आणि कार्यक्षमतेवर लक्ष केंद्रित करते

जाहीरनाम्यातील प्रमुख मुद्दे:
आर्थिक परिवर्तन घडवून आणण्यात एआयची भूमिका
मुक्त-स्रोत आणि सुलभ एआय परिसंस्थांचे महत्त्व
ऊर्जा-कार्यक्षम एआय पायाभूत सुविधांची आवश्यकता

विज्ञान, प्रशासन आणि सार्वजनिक सेवा पुरवठ्यात एआयचा वाढता सहभाग सुनिश्चित करणे

जागतिक सहकार्य मजबूत करणे

सहभागी सदस्यांनी खालील वचनबद्धतांचा पुनरुच्चार केला:

एआय प्रशासनातील सामायिक जागतिक प्राधान्यक्रमांचा विकास

स्वयंस्फूर्त, चाकोरीबद्ध नसलेल्या आराखड्यांना प्रोत्साहन

सततच्या सहकार्यातून कल्पना प्रत्यक्षात आणणे

या शिखर परिषदेने दीर्घकालीन आंतरराष्ट्रीय भागीदारींना गती मिळेल आणि आर्थिक विकासाचा प्रमुख प्रेरक घटक म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेला स्थान मिळेल, अशी अपेक्षा आहे.

89  देश आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनी मंजूर केलेला शिखर परिषदेतील ठराव खालीलप्रमाणे. [लिंक]

**नवी दिल्ली**

21 फेब्रुवारी 2026